# प्रकरण पाचवे
# मूल्यमापन

# प्रकरण - पाचवे

# मूल्यमापन

१९६२ साली कोल्हापूर येथे झालेली शिवाजी विद्यापीठाची स्थापना ही दक्षिण महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक इतिहासात अतिशय महत्त्वपूर्ण आहे. पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या कर्तृत्वाचा ठसा या विद्यापीठाच्या जडणघडणीवर कायमचा उमटला आहे. त्यांनी विद्यापीठाच्या विकासासाठी अनेक नवनवीन उपक्रम सुरू केले. त्यापैकी 'कमवा व शिका' योजना हा एक क्रांतीकारी प्रयोग ठरला आहे. ज्या बहुजन समाजाच्या पिढ्यान्‌पिढ्या अज्ञानाच्या अंध:कारात पिचत पडलेल्या होत्या, अशा बहुजन समाजाला स्वावलंबनातून उच्च शिक्षणाची सुविधा या योजनेमुळे आप्पासाहेबांनी उपलब्ध करून दिली. स्वाभिमानी व कार्यतत्पर विद्यार्थ्यांचे एक नवयुगच या योजनेद्वारे निर्माण झाले आहे.

भारतात इंग्रजांच्या आगमनामुळे पाश्चात्य शिक्षण प्रसाराला सुरूवात झाली. इंग्रजी शिक्षण घेवून प्रभावित झालेल्या समाजसुधारकांची पहिली पिढी बाहेर पडली. समाजाचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि शैक्षणिक विकास व्हावा यासाठी त्यांनी समाजशिक्षणाला महत्त्व दिले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, वि. रा. शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सर्वसामान्य लोकांपर्यंत ज्ञानाची गंगा पोचविण्यासाठी आयुष्य वेचले. १८५४ साली वूडच्या खलित्याने भारतीय शिक्षणाला पोषक वातावरण लाभले. त्यामुळे १८५७ मध्ये कलकत्ता, मद्रास, मुंबई विद्यापीठांची स्थापना झाली. याचाच फायदा कोल्हापूर शहरासही झाला. कोल्हापूर हे एक दक्षिण महाराष्ट्रातील प्रमुख शहर असून अनेक गोष्टींसाठी प्रसिद्ध आहे. दक्षिण काशी, शिक्षणाचे माहेरघर, प्रसिद्ध बाजारपेठ, कुशल कलाकारांचे कलापूर म्हणून प्रसिद्ध आहे. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून या शहराचे महत्त्व खूप वाढले. राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानात शिक्षणाचा प्रसार केला. महात्मा फुलेंच्या

कार्याने प्रेरित होवून, छत्रपती शाहूंनी स्वत: शिक्षणाचा ध्यास घेवून शिक्षण सर्वसामान्यांच्या झोपडीपर्यंत पोहोचावे यासाठी प्रयत्न केले. कोल्हापूरच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळाल्यानंतर आसपासच्या जिल्ह्यातून येणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करणारे कोल्हापूर हे प्रमुख केंद्र झाले.

शिक्षण महर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रतिकूल परिस्थितीतही विशिष्ट ध्येयाने प्रेरित होवून शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची सेवा केली. त्याकाळी अज्ञान, अंधश्रद्धेने ग्रासलेला बहुजन समाज शिक्षणापासून दूर होता. त्यांच्यात शिकण्याची उमेद होती पण त्यांना शहरात राहून शिक्षण घेणे शक्य नव्हते. अशी मुले फक्त आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नयेत तसेच त्यांच्यात शिक्षणानंतर शेती व इतर क्षेत्रातही कष्ट करण्याची क्षमता निर्माण व्हावी म्हणून कर्मवीरांनी छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथे श्रमावर आधारित 'कमवा व शिका' ही अभिनव योजना प्रथमपासूनच अंमलात आणली. सर्व धर्माच्या मुलांना कोणताही जातिभेद न पाळता श्रम करण्याची संधी देवून समाजात सख्ख्या भावंडांप्रमाणे एकत्र नांदण्याची दीक्षा देणाऱ्या या योजनेने नवा माणूस घडविण्याची प्रेरणा महाराष्ट्राला दिली.

विद्यार्थ्यांवर स्वावलंबन, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा इत्यादी मूल्यांचे संस्कार करणारी ही क्रांतीकारी योजना आहे. या योजनेचे माजी विद्यार्थी डॉ. सी. टी. पवार या योजनेविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणतात की, "डॉ. आप्पासाहेब पवार 'कमवा व शिका' योजनेने आम्हास स्वावलंबनाचे, संयोजनाचे, प्रतिकूल परिस्थितीशी झगडण्याचे, सत्याचे संस्कार दिले. आज माझ्यासारख्या शेकडो विद्यार्थ्यांचे जीवन मळे बहरले ते केवळ विद्यर्थी भवनच्या अस्तित्त्वामुळेच"[१] या योजनेपासून प्रेरणा घेवून रयत शिक्षण संस्थेच्या इतर शाखा तसेच विविध ठिकाणी या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली. शिक्षणातून समाजाच्या प्रगतीचे स्वप्न साकार करणाऱ्या डॉ. आप्पासाहेब पवारांनी विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू

मानून त्याच्या हिताचा ध्यास घेवून विद्यापीठात अनेक कल्याणकारी योजना राबविल्या आणि यशस्वीही करून दाखवल्या. कर्मवीरांनी सुरू केलेल्या या 'कमवा व शिका' योजनेच्या आचरणाने तळागाळातील बहुजन समाजात उच्च शिक्षणाचा प्रसार होवून समाजपरिवर्तनाच्या प्रक्रियेला वेग येईल, अशी डॉ. आप्पासाहेब पवारांची धारणा होती. म्हणूनच तरूण विद्यार्थ्यांची मने आणि मनगटे साधण्याची किमया करणाऱ्या या आदर्श योजनेची सुरूवात शिवाजी विद्यापीठात १९६९ साली केली. 'कमवा व शिका' ही योजना कोणत्या स्वरूपात चालविली जाणार आहे याची झलक विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी बांधलेल्या 'विद्यार्थी भवन' या वास्तूच्या निर्मितीतच दिसून आली. 'हे हात उगारण्यासाठी नसतात. उभरण्यासाठी असतात.' या बाबा आमटे यांच्या शब्दांची प्रचितीच विद्यार्थ्यांनी आणून दिली.[२] या योजनेअंतर्गत विद्यार्थी स्वत:च्या जेवणाचा, राहण्याचा व शिक्षणाचा खर्च स्वत:च श्रम करून मिळवितात. योजनेत मुलांना काम करण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून शेती, हायवे कॅन्टीन, वीटभट्टी, पिठाची गिरणी इत्यादी विभाग विद्यापीठात सुरू करण्यात आले. काळानुरूप भवन कार्यालय विभाग, भवन वाचनालय विभाग, मेस विभाग, पिठाची गिरणी, झेरॉक्स विभाग, टेलिफोन विभाग, इंटरनेट विभाग, बागकाम विभाग, ग्रंथालय विभाग, दुर्मिळ विभाग, संदर्भ विभाग, विमान इमारत विभाग, दवाखाना विभाग, क्रिडा विभाग, प्रकाशन विभाग, पुस्तक विक्री विभाग, नियतकालिके विभाग, इंजिनिअरिंग विभाग, मुख्य प्रशासकीय इमारत विभाग, मुद्रणालय विभाग इत्यादी नवीन विभागांची भर पडलेली आहे.

सध्याच्या युगात कॉलेजे, विद्यापीठे ही संस्कार केंद्र न राहता फक्त नोकरी मिळवून देणारी प्रमाणपत्र वितरण करणारी केंद्रे बनली आहेत. अशा वेळी शिक्षण हे विद्यार्थ्याला मोठे करण्याचे साधन आहे. त्याची शारीरिक व मानसिक क्षमता वाढविण्यासाठीच शिक्षण आहे, अशी शिकवण या योजनेमार्फत दिली जाते. योजनेत विद्यार्थ्यांचे श्रम हेच खरे भांडवल आहे. देशातील बहुसंख्य जनता ही ग्रामीण भागात राहते. त्यामुळे शिक्षणाला श्रमाची जोड देणाऱ्या योजनेमुळे आपण उच्च शिक्षण घेवू

शकतो या जाणिवेतून अनेक विद्यार्थी या योजनेकडे आकर्षित झाले. हे विद्यार्थी केवळ पुस्तकी न राहता कष्टाची सवय असल्यामुळे कोणत्याही कठीण परिस्थितीत स्वतःच्या हिमतीवर उभे राहू शकतात. संपूर्ण दिवसभर जरी हे विद्यार्थी शिक्षण व काम यात गुंतून राहत असले तरी ते अभ्यासातही पुढे असावेत, यासाठी त्यांना स्वतंत्र अभ्यासिका, पाठ्यपुस्तके, संदर्भ ग्रंथ यांची उपलब्धता करून दिलेली आहे. दरवर्षी विद्यापीठात साधारणतः १२५ मुले – मुली या योजनेचा लाभ घेतात. विद्यार्थ्यांच्या शारिरीक पात्रतेचा व आवडीनिवडीचा विचार करून त्यांना काम दिले जाते. त्यामुळे त्यांच्या कार्यशक्तीला प्रेरणा मिळून, श्रमातून त्यांच्यात सहजीवन व सहकार्याची भावना निर्माण होते. ठराविक वेळी ठराविक कामांचे नियोजन करून मुलींचाही योजनेतील सहभाग वाढविण्याकडे लक्ष दिले जात आहे. मुलींच्या राहण्याची व्यवस्था ही मुलींच्या वसतिगृहातच केलेली आहे. विद्यापीठाला कोणताही नफा मिळावा या हेतूने ही योजना चालविली जात नसून गोरगरीब समाजातील जिज्ञासू व गरजू विद्यार्थ्यांना श्रमाच्या बदल्यात उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हेच या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. आज बहुजन समाजात उच्च शिक्षणाचा जो प्रसार झाला आहे; त्यामध्ये विद्यापीठाबरोबरच 'कमवा व शिका' योजनेचा वाटाही महत्त्वपूर्ण असा आहे; शिवाजी विद्यापीठातील सर्व कुलगुरूंनी या योजनेच्या विकासाला हातभार लावला आहे.

श्रमाची प्रतिष्ठा वाढवून स्वावलंबनाने शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी या योजनेतून निर्माण झाले असून जीवनाच्या विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवित आहेत. मुख्यतः शिक्षण, संशोधन, साहित्य–कला, उद्योग, प्रशासन अशा विविध क्षेत्रात योजनेचे विद्यार्थी अग्रेसर आहेत. डॉ. सी. टी. पवार, प्राचार्य भैरव कुंभार, प्राचार्य डॉ. व्ही. एस. लिपारे, डॉ. बी. एल. पाटील (संचालक, रयत शिक्षण संस्था), डॉ. एस्. एन्. पठाण (कुलगुरू संत गाडगे महाराज विद्यापीठ, नागपूर), प्रा. जी. एस. हिरेमठ, प्रा. डॉ. एन. डी. कदम, डॉ. पांडुरंग जयंत केचे (विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग), डॉ. एस. एच. पवार, प्राचार्य

डॉ. डी. व्ही. तोगले, डॉ. चंद्रकांत भोसले, डॉ. तुकाराम पाटील, शहाजीराव देशमुख, डॉ. मुरलीधर डोंगरे, डॉ. चंद्रकांत कुंभार (जिल्हा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर) अशा प्रतिथयश विद्यार्थ्यांची परंपरा विद्यापीठातील या 'कमवा व शिका' योजनेस लाभलेली आहे.

'कमवा व शिका' या योजनेबाबत त्याचे दोन शिल्पकार कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या दृष्टिकोनाबाबत विचार केला तर असे दिसून येईल की, कर्मवीरांनी आपल्या या योजनेत शारिरीक श्रमाला फार महत्त्व दिले होते. प्रत्येकाने श्रम केलेच पाहिजेत अशी त्यांची धारणा होती. विद्यार्थ्यांने दुसऱ्याच्या मदतीवर आपले शिक्षण वेळेवर पूर्ण करण्यापेक्षा, स्वत:च्या कष्टाने आपले शिक्षण पूर्ण करताना एखादे वर्ष जास्त लागले तरी चालेल असे त्यांचे विचार होते. तर याच योजनेचा आदर्श घेवून डॉ. आप्पासाहेब पवारांनी शिवाजी विद्यापीठात ही योजना सुरू केली होती. त्यांनी योजनेत शारीरिक श्रमाएवढेच शिक्षणालाही महत्त्व दिले होते. योजनेतील मुलांना शिक्षणाचे महत्त्व सांगताना आप्पासाहेब म्हणत की, "लक्षात ठेवा तुम्ही येथे काम करण्यासाठी नाही आलात. एखादे वेळी काम चुकले तरी चालेल पण अभ्यास चुकवू नका." परंतु या दोघांचेही 'कमवा व शिका' ही योजना सुरू करण्या पाठीमागे उद्दिष्ट एकच होते आणि ते म्हणजे ग्रामीण समाजातील गरीब परंतु गुणी, जिज्ञासू व गरजू विद्यार्थ्यांना स्वावलंबनाने स्वत:चे शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देणे. देशात विविध ठिकाणाबरोबरच परदेशातही 'कमवा व शिका' योजना राबविली जात आहे. तसेच या दोन्हीही योजना एकमेकांना पूरक अशाच आहेत. रयत शिक्षण संस्थेतील योजनेतून पदवीपर्यंतचे शिक्षण घेवून नंतर शिवाजी विद्यापीठातील योजनेतून आपले उच्च शिक्षण पूर्ण करणाऱ्यांचे प्रमाणही लक्षणीय असे आहे. यामध्ये प्रामुख्याने प्राचार्य डॉ. बी. एल. पाटील, डॉ. व्ही. एस. लिपारे, डॉ. एस्. एन्. पठाण, डॉ. पांडुरंग जयवंत केचे यांचा समावेश होतो. त्याचपद्धतीने छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा येथील 'कमवा व शिका' योजनेच्या यशाएवढे नंतर फक्त

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका' योजनेनेच यश मिळविलेले आहे. यातच ही योजना व शिवाजी विद्यापीठाचे यश सामावलेले आहे.

आज एकविसाव्या शतकात शिक्षणाचा प्रसार भरपूर झाला आहे, नवी विद्यापीठे स्थापन होत आहेत, एकूण पदवीधरांची संख्या वाढत आहे, शासनाचा शिक्षणावरील खर्चही वाढतो आहे. तरीही आजच्या शिक्षण व्यवस्थेत काही त्रुटी आहेत. कारण आजही बहुसंख्य असंघटित ग्रामीण जनता उच्च शिक्षणापासून वंचित आहे. म्हणून आपल्या शेतीप्रधान व विकसनशील भारत देशातील अशा तऱ्हेचे शैक्षणिक दारिद्र्य नष्ट करून प्रगती करण्यासाठी 'कमवा व शिका' या क्रांतिकारी योजनेचा वापर फार महत्त्वाचा ठरू शकतो. तरीही योजना राबवताना काही समस्या जाणवतात.

**या योजनेबाबतच्या काही समस्या :**

१) अलिकडच्या काळात शिक्षण प्रसारामुळे बहुजन समाजात नोकरी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळे अनेक कुटुंबे आर्थिक दृष्ट्या सुस्थितीत आली आहेत. अशा कुटुंबातील मुले कष्ट करून शिक्षण घेण्यास नाखूष असतात. समाजाच्या वृत्तीत झालेल्या या बदलांमुळे 'कमवा व शिका' योजनेचे महत्त्व काहीसे कमी झाल्याचे दिसून येते.

२) विद्यापीठात ही योजना सुरू केल्यानंतर प्रारंभीच्या काळात यातून पदव्युत्तर शिक्षण घेवून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना हमखास विद्यापीठीय कक्षेत नोकरी मिळत असे. शैक्षणिक पात्रतेनुसार कोणाच्याही शिफारसी शिवाय हे नोकरीत प्राधान्य मिळत असे. या योजनेतून शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण अधिक व शासकीय नियम यामुळे सर्व विद्यार्थ्यांना नोकरी मिळणे कठीण झाले आहे. या योजनेकडे नोकरीचे साधन म्हणून पाहिले जात होते. पण आता परिस्थिती पूर्णपणे बदलत आहे. त्यामुळे या योजनेकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झालेला दिसतो.

३) गरीब, होतकरू, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणाऱ्या समाजातील लोकांच्यासाठी ही योजना अस्तित्वात आली होती. स्वावलंबनामुळे नवा आदर्श निर्माण करता येतो, म्हणूनही ही योजना महत्त्वाची होती.

सध्याच्या युगात हे आदर्श मागे पडून स्वत: कष्ट न करता दुसऱ्याच्या श्रमावर चैन करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. तसेच भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. त्यामुळे या योजनेचे महत्त्व कमी होत असल्याचे दिसून येते.

४) शिक्षण प्रसाराच्या सरकारच्या धोरणामुळे मोठमोठ्या शहरांमध्ये नवनवीन महाविद्यालये निघण्यास सुरूवात झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या सोयी, सुविधा तालुक्याच्या, जिल्ह्याच्या ठिकाणी उपलब्ध होत गेल्या, त्यामुळे स्वत:च्या गावापासून दूर शिवाजी विद्यापीठात जावून योजनेत सहभागी होवून शिक्षण घेण्यास विद्यार्थ्यांना कठीण वाटू लागले. त्यामुळे या योजनेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या घटत चालली आहे.

५) १९५९ साली महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेली ई.बी.सी. सवलत आजही सुरू आहे. याचा आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना फायदा होतो आहे. त्यामुळे स्वावलंबनातून स्वत:चे शिक्षण पूर्ण करण्याची गरज विद्यार्थ्यांना वाटेनासी झाली आहे. परिणामी या योजनेकडे विद्यार्थ्यांचा कल कमी झाल्याचा दिसतो.

तरीही महाराष्ट्रातील दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या बहुजन समाजातील गरीब विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना आवश्यक वाटते. ही आदर्श योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी अभ्यासांती काही उपाय सुचविले आहेत ते पुढीलप्रमाणे.

**उपाय :**

१) योजनेतील विद्यार्थी जास्तीत जास्त वेळ योजनेअंतर्गत कामात गुंतून पडल्यामुळे त्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होते. तेव्हा त्यांच्या निवासस्थानी रात्री एक—दोन तास त्यांना जादा शैक्षणिक मार्गदर्शनाची सोय मिळावी.

२) अपुऱ्या निवास व्यवस्थेमुळे मर्यादितच विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत प्रवेश मिळतो, तर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सामावून घेण्यासाठी त्यांच्या निवासासाठी स्वतंत्र वसतिगृहांची उभारणी करावी.

३) परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त वेळ अभ्यासासाठी मिळावा म्हणून परीक्षा कालावधीच्या चार ते पाच दिवस अगोदर कामातून त्यांना पूर्ण मोकळीक देण्यात यावी. ज्यांची परीक्षा झाली असेल व ज्यांची परीक्षा नंतर असेल अशाच विद्यार्थ्यांना काम द्यावे.

४) योजनेच्या सुरूवातीच्या काळात विद्यार्थ्यांना काम करीत असताना वापरण्यासाठी एक खाकी रंगाचा ड्रेस दिला जात असे, परंतु शेती विभाग बंद झाल्यानंतर विद्यार्थ्यांना मिळणारा हा ड्रेसही बंद झाला आहे, तरी विद्यार्थ्यांना वर्षातून एक ड्रेस त्यांच्या पसंतीनुसार दिला तर श्रम करताना त्यांना अधिक उत्साह वाटेल.

५) योजनेतील विद्यार्थ्यांना सुरूवातीला ज्या जीवनोपयोगी वस्तूंच्या सवलती मिळत असत. त्यात काळानुसार बदल करून वाढ करणे आवश्यक आहे.

६) संगणक ज्ञान आजच्या काळाची गरज आहे. यामध्ये योजनेचे विद्यार्थी पाठीमागे राहू नयेत, म्हणून 'विद्यार्थी भवन' मध्ये स्वतंत्र संगणक कक्षाची सोय करण्यात येवून योजनेतील विद्यार्थ्यांना संगणक ज्ञान देण्याची व्यवस्था करावी.

७) विद्यापीठातील विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता विद्यापीठ परिसरात अल्पोपहाराची सोय करणारे 'स्नॅक पॉईंट' योजनेमार्फत सुरू करावेत.

८) योजनेतील बंद असलेला शेती विभाग पुन्हा सुरू करावा. त्यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक श्रम करण्याची संधी पुन्हा उपलब्ध होईल व श्रमाने विद्यार्थ्यांचे शरीर सुदृढ होईल.

९) विद्यापीठाकडून ठराविक क्षेत्र घेवून तेथे स्वतंत्र असा भाजीपाला विभाग सुरू करावा. जेणेकरून मिळणाऱ्या भाजीपाल्याच्या उत्पन्नातून विद्यापीठातील वसतिगृहातील मेसना भाजीपाल्याचा पुरवठा करता येईल व त्याद्वारे योजनेचे उत्पन्न वाढेल.

१०) प्रायोगिक तत्वावर विद्यापीठाच्या विस्तृत परिसरात फळ झाडांची लागवड करून त्याचे संपूर्ण व्यस्थापन या योजनेमार्फत केले जावे.

त्यापासून मिळणाऱ्या फळांची विक्री करून योजनेस उत्पन्नही मिळविता येईल.

११) योजनेमार्फत जनावरांचा गोठा बांधून तेथे दुभती जनावरे पाळावीत त्यांच्या दुधाचे संकलन व दुधाची विक्री करावी त्यापासून योजनेला उत्पन्न मिळू शकेल.

१२) योजनेअंतर्गत 'ग्रीन हाऊस (हरितगृह)' ची उभारणी करावी त्याद्वारे विद्यार्थ्यांना आधुनिक शेतीचे धडे मिळतील व योजनेच्या उत्पन्नातही वाढ होईल.

१३) योजनेचे काही विभाग बंद आहेत त्याला कारणीभूत कारणांपैकी त्या विभागातून होणारा आर्थिक तोटा हे एक कारण आहे. त्यामुळे आज 'विद्यार्थी भवन' मध्ये चालू असणाऱ्या सर्व विभागांवर प्रकाश टाकणारा असा भवनचा वार्षिक अहवाल स्वतंत्रपणे प्रकाशित व्हावा. त्यामुळे भवनच्या कोणत्या विभागातून फायदा होतो? कोणत्या विभागातून तोटा होतो? हे लक्षात येईल. त्यामुळे तोटा असणारे विभाग फायद्यात आणण्यासाठी उपाययोजना करणे सोयीचे जाईल, कारण कोणताही विभाग बंद करणे हा त्या समस्येवर उपाय नाही. तसेच पुढे योजनेवर संशोधन करू इच्छिणाऱ्या संशोधकांना व जाणकार मंडळींना या वार्षिक अहवालांचा फायदाच होईल.

१४) योजनेअंतर्गत चालविले जाणारे विविध विभाग आणि त्यांचे आर्थिक व्यवहार यांची नोंद ठेवण्यासाठी अनुभवी व्यक्तीची नियुक्ती करावी योजनेतून मिळणाऱ्या समाधानकारक उत्पन्नातून त्या व्यक्तीचे वेतन दिले जावे.

१५) योजनेत दरवर्षी जुने विद्यार्थी जावून नवीन विद्यार्थी येतात. सर्व आजी–माजी विद्यार्थ्यांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांकाची स्वतंत्र नोंद भवन कार्यालयात ठेवावी. या आजी–माजी विद्यार्थ्यांचा संमेलन मेळावा आयोजित करावा. जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांचा योजनेशी असणारा संपर्क कायम राहून नवीन विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवाचा, मार्गदर्शनाचा लाभ होईल.

१६) योजनेचे असणारे अधिक्षक (रेक्टर्स) हे विद्यापीठात पूर्ण वेळ प्राध्यापक म्हणून सेवेत असतात. त्यामुळे त्यांना योजनेकडे जास्त वेळ देता येत नाही. त्यामुळे योजनेच्या व्यवस्थापनात विविध अडचणी येतात म्हणून योजनेसाठी पूर्णवेळ अधिक्षकाची नियुक्ती तीन—तीन वर्षाच्या कालावधीसाठी करावी.

१७) आधुनिक युगात राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झालेली आहे. विद्यापीठ वसतिगृहातील विद्यार्थी बाहेरच्या इस्त्री केंद्रात स्वत:चे कपडे देतात, तर कमी दरात या योजनेअंतर्गत इस्त्री विभाग चालू करून त्याची विद्यापीठातील विद्यार्थ्यांना सोय उपलब्ध करून द्यावी. त्यामुळे योजनेला उत्पन्नाचे साधनही उपलब्ध होईल.

१८) ऊस, विविध फळे यांचा रस आणि थंड पेयांचा समावेश असणारे रसपानगृह योजनेमार्फत सुरू करावे. त्या माध्यमातूनही योजनेस उत्पन्न मिळविता येईल.

**निष्कर्ष :**

१) या योजनेमध्ये सर्व जाती धर्माची मुले कोणताही भेदभाव न पाळता एकत्र राहून शिक्षण घेतात. त्यामुळे त्यांच्यात सर्वधर्म समभाव व राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागते.

२) या योजनेतील विद्यार्थी अत्यंत प्रामाणिक, वरिष्ठांचा आदर करणारा असल्याने प्राध्यापकही तेवढ्याच आपुलकीने विद्यार्थ्यांना वागवितात. तसेच योग्य मार्गदर्शनाबरोबर अडीअडचणींच्या काळात मदतही करतात.

३) या योजनेने श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. योजनेतील विद्यार्थ्यांला कोणतेही काम करण्याची लाज वाटत नाही. त्यामुळे योजनेचे विद्यार्थी भावी आयुष्यात श्रमाला महत्त्व देवून स्वावलंबनाने जीवन जगतात.

४) श्रमाएवढेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे लक्ष योजनेत दिले जाते. उच्चविद्याविभूषित, सुजाण नागरिक योजनेतून निर्माण झाले आहेत.

५) 'कमवा व शिका' ही योजना सुरूवातीपासून गरजू विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्राबरोबरच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातूनही आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी कोणतेही कष्ट करण्याची तयारी असलेले विद्यार्थी येथे या योजनेमार्फत उच्च शिक्षण पूर्ण करतात.

६) या योजनेने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास आणि कोणतेही काम तडीस नेण्याची उर्मी निर्माण केलेली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासूनचा इतिहास पाहता असा निष्कर्ष निघतो की, ज्या हेतूने कर्मवीरांनी सुरू केलेली 'कमवा व शिका' योजना डॉ. आप्पासाहेब पवारांनी शिवाजी विद्यापीठातही राबविली तो हेतू पूर्णत: सफल झाल्याचा दिसतो. या योजनेमुळे बहुजन समाजातील अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे शक्य झाले. या स्वावलंबी योजनेमुळे त्यांच्यात स्वाभिमान जागृत झाला पैसे मिळविण्यासाठी किती कष्ट पडतात याची जाणिव त्याला झाल्यामुळे ही मुले स्वत: निर्व्यसनी होवून स्वत:चे जीवन काटकसरीने जगतात. तसेच असे स्वावलंबी विद्यार्थीच आपल्या भावी आयुष्यात उत्तम नागरिक बनतात व देशाच्या प्रगतीला हातभार लावतात. अशा प्रकारच्या नागरिकांची देशाला गरज आहे. यामध्येच 'कमवा व शिका' योजनेचे यश दडले आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**संदर्भ :**

१) 'श्रमयोगी' कमवा आणि शिका योजनेचा रौप्यमहोत्सवी समारंभ अंक, प्रकाशन २१ ऑगस्ट १९९५, पृष्ठ — २५.

२) कित्ता, पृष्ठ — २१.